(9)

दूरध्वनी : २८४ १५ ७६ / २०२ ६२ ४९ फॅक्स : २०२ ९३ ४८
ग्राम : पाणीमंडळ, मुंबई

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉइंट, मुंबई ४०० ०२१

***क्र.मजीप्रा/२००२/सभा-९३/आ-४/*** ***दि.२९ जुलै,२००२***

***विषय*** : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९३ व्या सभेचे इतिवृत्त.

दि.२५ जुलै,२००२ रोजी दुपारी ३ वाजता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची ९३ सभा आयोजित करण्यात आलेली होती. सदर सभेचे इतिवृत्त आपल्या मान्यतेसाठी सोबत सादर करण्यांत येत आहे.

सदर इतिवृत्तास मान्यता मिळताच इतिवृत्तामध्ये सूचित केल्यानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात येतील.

मान्यतेसाठी सादर.

२९/७/०२

***(राजेंद्र सगणे)***
***सदस्य सचिव***

मा सचिव

मुख्य अ

आ ४

***मा.मंत्री,ग्रा.वि.,पा.पु.व स्व.***
***तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष***

३१/७

१/८



(महाराष्ट्र शासन उपक्रम)

(२)

दूरध्वनी : २८४ १५ ७६ / २०२ ६२ ४९ फॅक्स : २०२ ९३ ४८
ग्राम : पाणीमंडळ, मुंबई

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१

जा.क्र.मजीप्रा/सस(प्र)/बैठक-९२/(४)/आ-४. दिनांक : १३.८.२००२

प्रति,

मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सचिव, (लेखा व कोषागरे), वित्त विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सचिव, उद्योग, उर्जा व कामगार विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सचिव (२), नगर विकास विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई-३२
सचिव, ग्राम विकास विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई-३२
सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई-२१

**विषय :** गुरुवार दिनांक २५ जुलै, २००२ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९३व्या सभेचे इतिवृत्त ..

महोदय,

दिनांक २५ जुलै, २००२ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या ९३व्या सभेचे इतिवृत्त यासोबत पाठविण्यांत येत आहे.

वरील इतिवृत्ताबाबत आपले काही अभिप्राय असल्यास, ते या कार्यालयास कृपया त्वरीत कळवावेत. म्हणजे ते प्राधिकरणाच्या पुढील सभेत विचारासाठी ठेवण्यात येतील.

आपला,

( शेखर गायकवाड)
**मुख्य प्रशासकीय अधिकारी**

**प्रत,**
वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई.
अधीक्षक अभियंता, म.नि.सं. व सं. कक्ष, / (समन्वय) मुंबई .
एनएनजी..सभा..

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९३ व्या सभेचे इतिवृत्त

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची ९३ वी सभा मा.मंत्री,ग्रा.वि.,पा.पु.व स्व. तथा प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष मा.ना.श्री.आर.आर.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली दि.२५ जुलै,२००२ रोजी दुपारी ३.०० वाजता संपन्न झाली. या सभेस प्राधिकरणाचे खालील सदस्य तसेच अधिकारी उपस्थित होते.

१. श्री.आर.आर.पाटील,मा.मंत्री, ग्रा.वि.,पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
२. श्रीमती सुलेखाताई कुंभारे,मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाच्या उपाध्यक्षा, मंत्रालय, मुंबई.
३. श्री.बी.सी.खटुआ,सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
४. श्री.सुभाष लाला,सचिव, नगर विकास विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई
५. श्री.विनोद कुलकर्णी, उप सचिव, वित्त विभाग(सचिव,वित्त विभाग यांचे प्रतिनिधी )
६. श्री.भि.रा.उके,उप सचिव(सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे प्रतिनिधी) तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
७. श्री.राजेंद्र सगणे,सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई-२१

या व्यतिरिक्त सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

१. श्री.सु.व्ही.वाघ,मुख्य अभियंता,म.जी.प्रा.ठाणे
२. श्री.सागर रानडे,मुख्य अभियंता,म.जी.प्रा,अमरावती
३. श्री.शेखर गायकवाड,मुख्य प्रशासकीय अधिकारी,म.जी.प्रा.,मुंबई
४. श्री.वेंकट कल्याणकर,अधीक्षक अभियंता(समन्वय)म.जी.प्रा,मुंबई
५. श्री.प्रदीप गोखले,अ.अ.,म.जी.प्रा.मंडळ,अमरावती
६. श्री.एस.जी.तिवसकर,अ.अ.(यां),म.जी.प्रा.मंडळ,ठाणे
७. श्री.बा.शि.पाटील,उप मुख्य लेखा अधिकारी(१),म.जी.प्रा.,नवी मुंबई
८. श्री.बी.सी.हंगे,उप मुख्य लेखा अधिकारी(२),म.जी.प्रा.,नवी मुंबई
९. श्री.ए.एस.शिरुडे, उप मुख्य लेखा अधिकारी(३),म.जी.प्रा.,नवी मुंबई

मा.मंत्री, ग्रा.वि.,पा.पु.व स्व.तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेस सुरुवात झाली.

## कार्यक्रम बाब क्र.१:- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९२ व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे.

९२ व्या सभेच्या इतिवृत्ताबाबत सर्वसाधारणपणे चर्चा करण्यांत येऊन इतिवृत्तास मान्यता देण्यात आली.

....२....

## कार्यक्रम बाब क्र.२:- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९१ व ९२ व्या सभेतील निर्णयांवर करण्यात आलेली कृती.

या कार्यक्रम बाबीमध्ये जी कार्यवाही नमूद करण्यांत आली आहे त्याचा सर्वकष आढावा घेऊन खालीलप्रमाणे माहिती सादर करावी असा निर्णय घेण्यात आला.

### १) पाणी पुरवठा योजनेसाठी विद्युत जोडणीचे काम प्राधिकरणाने करणेबाबत.

अ) ज्या पाणी पुरवठा योजना पूर्ण झालेल्या आहेत पण त्यांना विद्युत जोडणी न मिळाल्यामुळे त्या कार्यान्वित करण्यास विलंब होत आहेत, त्या योजनांची माहिती सादर करावी.

ब) पाणी पुरवठा योजनांसाठी घेण्यात आलेल्या विद्युत जोडणीमधून इतर ग्राहकांना महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने विद्युत जोडणी देऊ नये अशी विनंती त्यांना करण्यात यावी.

क) ज्या पाणी पुरवठा योजनांसाठी विद्युत जोडणीची मागणी करण्यांत आलेली आहे, त्या ठिकाणी जी अंदाजपत्रके प्राप्त होत आहेत त्यापैकी काही खूप जास्त (अवाजवी) किंमतीची असल्याने त्यांचा आढावा घेण्यात यावा व सदर अंदाजपत्रकांमधील किंमती कमी करण्याबाबत महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाशी संपर्क साधावा . तसेच, गरजेइतकाच पुरवठा त्यांच्याकडून प्राप्त करुन घेण्याचे प्रयत्न करावेत. उदा.११ के.व्ही.चे लोड लागणार असेल तर ३३ के.व्ही.लोड घेण्यात येऊ नये.

ड) विद्युत जोडणीसाठी ज्या ठिकाणी रक्कम अदा केलेली आहे पण विद्युत जोडणी प्राप्त झालेली नाही, अशा योजनांची माहिती देखील सादर करण्यात यावी.

इ) ज्या पाणी पुरवठा योजनांसाठी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने गेल्या ३-४ वर्षामध्ये विद्युत जोडण्या दिलेल्या आहेत, त्या ठिकाणची अंदाजपत्रके तपासण्यात यावीत व ती वस्तुनिष्ठ आहेत याची खात्री करावी. काही प्रकरणी विद्युत मंडळाकडून जास्तीची मागणी करण्यात आली असल्यास, सदर प्रकरणे शासनाचे निदर्शनास आणून दयावीत.

### २) अहमदनगर वाढीव पाणी पुरवठा योजना व निलंगा पाणी पुरवठा योजना

या दोन्ही पाणी पुरवठा योजनांबाबतचे प्रस्ताव या पूर्वी प्राधिकरणाच्या सभेमध्ये मंजूर करण्यात आले होते. तथापि, त्याचा पुर्नविचार करण्याचे जे प्रस्तावित करण्यात आले आहे ते का प्रस्तावित केले अशी विचारणा केली. या अनुषंगाने सर्वकष प्रस्ताव तयार करुन त्या अनुषंगाने सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचेशी चर्चा करुन सविस्तर प्रस्ताव प्राधिकरणाच्या पुढील सभेमध्ये माहितीस्तव सादर करावा.

### ३) <u>ग्रामीण व नागरी पाणी पुरवठा/मलनिःसारण योजनांकरिता घ्यावयाचे आयुर्विमा कर्ज</u>

सन २००१-२००२ या वर्षाकरिता आयुर्विमा महामंडळाने मंजूर केलेले आयुर्विमा कर्ज, अद्याप शासनाची हमी न मिळाल्याने, प्राधिकरणास मिळालेले नाही व त्याचा परिणाम कामांवर होत आहे याची नोंद प्राधिकरणाकडून घेण्यात आली व पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने या प्रकरणी सत्वर पुढील कार्यवाही करावी अशी विनंती त्यांना करावी असे ठरविण्यात आले.

### <u>कार्यक्रम बाब क्र.३:- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला योजनांसाठी उपलब्ध निधीची कमतरता व त्यानुसार कामाच्या अंमलबजावणीचे नियोजन.</u>

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणांतर्गत सुरु असणाऱ्या ग्रामीण व नागरी पाणी पुरवठा तसेच मलनिःसारण योजनांसाठी व प्रत्यक्षात उपलब्ध असणारा निधी याबाबतची माहिती या कार्यक्रम बाबीव्दारे सादर करण्यात आलेली आहे. या योजना प्रत्यक्षात पूर्ण करण्यासाठी खूप मोठया निधीची आवश्यकता आहे. तथापि, निधीच्या उपलब्धतेवर खूपच मर्यादा आहेत. त्यामुळे उपलब्ध निधीचा विनियोग गरजेवर आधारित असावा याची दक्षता प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी घ्यावी असे सूचित करण्यांत आले.

पाणी पुरवठा योजनांसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून उभारण्यात आलेले कर्जरोखे याबाबतची माहिती प्राधिकरणाकडून घेण्यात आली. या कर्जरोख्यांवरील व्याजाची तसेच मुद्दलाची परतफेड करण्याची जबाबदारी शासनावर आहे. तथापि, या कारणास्तव शासनाकडून निधी उपलब्ध होण्यामध्ये अडचणी आलेल्या आहेत. त्यामुळे कामासाठी प्राप्त झालेला निधी कर्जाच्या मुद्दलाची व व्याजाची परतफेड करण्यासाठी वळवावा लागत आहे. परिणामी, पाणी पुरवठा योजनांसाठी निधी उपलब्ध होत नाही. ही वस्तुस्थिती विचारात घेण्यात येऊन शासनास कर्जरोखे व त्यावरील व्याजाच्या परतफेडीसाठी निधी वर्ग करावा, अशी विनंती करुन निधी मिळविण्यासाठी पाठपुरावा करावा असे ठरविण्यांत आले.

१९९९ पासून पूर्ण करण्यात आलेल्या व हस्तांतरित झालेल्या ग्रामीण व नागरी पाणी पुरवठा योजना व त्यावर करण्यात आलेला खर्च याबाबतची माहिती अध्यक्ष/ उपाध्यक्ष महोदयांना व पाणी पुरवठा विभागास सादर करण्यात यावी. तसेच, ज्या पाणी पुरवठा योजना म.जी.प्राधिकरणाकडून चालविण्यात येत आहेत त्याबाबतचा तपशील सादर करावा असे निर्देशित करण्यात आले.

नागरी पाणी पुरवठा योजनांसाठी हुडको या वित्तीय संस्थेकडून घ्यावयाचे कर्ज याबाबतही पुढील कार्यवाही सत्वर करण्यात यावी असे निर्देश देण्यात आले.

(६)



**कार्यक्रम बाब क्र.४:- राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सेवातंर्गत आश्वासित प्रगती योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास लागू करणेबाबत.**

महाराष्ट्र शासनाने कालबध्द पदोन्नतीची व आश्वासीत प्रगती योजना त्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी लागू केलेली आहे. सदर दोन्ही योजना प्राधिकरणाच्या अधिकारी/कर्मचारी यांना लागू करण्यास मान्यता देण्यात आली . याबाबतचा प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी सत्वर सादर करावा, असे सूचित करण्यात आले. तसेच, अनुकंपा तत्वावर कर्मचा-यांची नियुक्ती करणे याबाबत शासन स्तरावर जो निर्णय होईल, तो प्राधिकरणातही त्वरित अंमलात आणला जावा, असे निर्देशित करण्यांत आले.

**कार्यक्रम बाब क्र.५:- टँकरमुक्ती कार्यक्रमातंर्गत नव्याने निर्माण विशेष कार्य अधिकारी (प्रशासन),सदस्य सचिव(प्रशासन व बाहय अर्थसहाय्य संबोधलेले) पद रद्द करणेबाबत व काम वाटपाचे आदेश रद्द करण्याबाबत.**

या कार्यक्रम बाबीव्दारे सादर करण्यांत आलेल्या प्रस्तावाचा प्रथमदर्शनी आढावा घेण्यात आला. तथापि, या प्रकरणी उच्च स्तरावर कार्यवाही सुरु असल्यामुळे सद्यस्थितीत या कार्यक्रम बाबीच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याची आवश्यकता नसल्याचे अध्यक्ष महोदयांनी विशद केले. त्यामुळे या कार्यक्रम बाबीच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा करण्यात आली नाही.

**कार्यक्रम बाब क्र.६:- अमरावती जिल्हयातील दर्यापूर-अंजनगांव भातकुली तालुक्यामधील दर्यापूर व अंजनगांव शहर व १५६ गावांची सामुहिक वाढीव पाणी पुरवठा योजना राबविणे व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणांमार्फत स्वतंत्र संस्थेची स्थापना करुन सदर संस्थेमार्फत स्वतंत्रपणे योजनेची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती तसेच व्यवस्थापन करणेबाबत.**

अमरावती जिल्हयातील दर्यापूर-अंजनगांव भातकुली तालुक्यामधील दर्यापूर व अंजनगांव शहर व १५६ गावांची सामुहिक वाढीव पाणी पुरवठा योजनेचा आढावा घेण्यात आला. या योजनेव्दारे अंजनगाव व दर्यापूर शहरास तसेच सभोवतालच्या काही खेडयांना पाणी पुरवठा चालू करण्यात आलेला असल्याने या पाणी पुरवठयाची आकारणी कोणत्या दराने करावी याबाबत निर्णय घेण्यासाठी हा प्रस्ताव सादर केलेला आहे, याची कल्पना देण्यात आली. अंजनगाव शहरास प्राधिकरणाकडून थेट ग्राहकांपर्यत पाणी पुरवठा करण्यात येतो. तसेच पाणीपट्टीची वसुलीही करण्यात येते. तथापि, दर्यापूर शहराची पाणी पुरवठा योजना ही नगरपरिषदेकडून चालविण्यात येते. त्यामुळे दर्यापूर नगरपरिषदेकडून त्यांची पाणी पुरवठा योजना प्राधिकरणाने

....५..

हस्तांतरित करून घेणे आवश्यक आहे. तसेच शासन निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार एका स्वतंत्र संस्थेव्दारे प्रस्तुत योजना चालविण्याचे प्रस्तावित असल्याने या स्वतंत्र संस्थेचे स्वरुप कसे असावे याचा निर्णय घेण्यासाठी हा प्रस्ताव सादर केलेला आहे. याचीही कल्पना देण्यात आली.

स्वतंत्र संस्थेचे स्वरुप कसे असावे व त्यांचे अधिकार याबाबत सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्याशी सविस्तर चर्चा करुन निर्णय घेण्यात यावा. सद्यस्थितीत, पाणी पुरवठयाबाबत जी व्यवस्था करण्यात आलेली आहे तीच व्यवस्था पुढील दोन महिन्यांसाठी सुरु ठेवण्यात यावी. आवश्यकता असल्यास, याबाबत एका तज्ञ समितीची नेमणूक करुन व्यवस्थापनाबाबत निर्णय घेण्यात यावा. दर्यापूर नगरपरिषदेशी चर्चा करुन अंतीम प्रस्ताव तयार करावा व प्राधिकरणाच्या पुढील सभेत सादर करावा असे ठरविण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.७:- मिरा-भाईंदर अतिरिक्त ५० द.ल.लि.क्षमतेची पाणी पुरवठा योजना कंत्राट क्र.ब.१/३८ व ब.१/३९ नुसार कंत्राटदारास सोपविलेल्या कामांवर केलेली दंडात्मक कारवाई, कंत्राटदारांच्या समस्या व त्या संदर्भात करावयाची कारवाई.**

या प्रकरणी सर्वकष चर्चा करण्यात येवून असे ठरविण्यांत आले की, श्री.मेराणी,निवृत्त प्रधान सचिव,सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात यावी. सदर समितीमध्ये श्री.एस.आर.तांबे, निवृत्त सचिव,सार्वजनिक बांधकाम विभाग व श्री.बी.व्ही.रोटकर,सेवानिवृत्त सदस्य सचिव,म.जी.प्रा., यांचा समावेश असावा. (परंतू, कमीत-कमी २ सदस्य असावे )सदर समितीने या प्रकरणी अंतीम प्रस्ताव सादर करावा व त्या अनुषंगाने निर्णयार्थ प्रस्ताव प्राधिकरणासमोर सादर करावा असे ठरविण्यांत आले.

या प्रकरणी सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, सदस्य सचिव,म.जी.प्रा. व मुख्य अभियंता,म.जी.प्रा.ठाणे यांनी त्वरित निर्णय घ्यावा, असेही सूचित करण्यांत आले.

**कार्यक्रम बाब क्र.८:- महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ,ठाणे अंतर्गत न्हावा-शेवा पाणी पुरवठा,टप्पा-१ ची कोन गावाजवळ पनवेल तालुका येथील गुरुत्ववाहिनी मुंबई-पुणे एक्सप्रेस वे बांधकामामुळे मजबूतीकरण करणे व हलविणेबाबत.**

न्हावाशेवा पाणी पुरवठा टप्पा-१ ची योजना प्राधिकरणाकडून चालविण्यात येत असून, या योजनेपोटी प्राप्त होणारा महसूल विचारात घेता तसेच प्रस्तावित कार्यक्रम बाबीव्दारे विशद करण्यात आलेल्या कामाची आवश्यकता विचारात घेऊन प्रस्ताव मान्य करण्यात आला. या कामांवर झालेल्या खर्चाची तरतूद सन २००१-२००२ च्या लेखा शीर्षामध्ये करण्यास मंजूरी देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.९:- वसई-विरार उप प्रादेशिक पाणी पुरवठा योजना(सूर्या प्रकल्प उद्‌भव) बहाडोली येथील पुलाचे बांधकाम कोसळल्यामुळे सल्लागार मे.शहा टेक्नीकल कंन्सलटंट प्रायव्हेट लि.,मुंबई यांचेवर कारवाई करणेबाबत.**

बहाडोली येथील पुलाच्या बांधकामाबाबत सल्लागार मे.शहा टेक्नीकल कन्सलटंट प्रा.लि.मुंबई यांनी दिलेल्या अहवालामध्ये त्रुटी असल्याने सदर त्रुटींबाबत त्यांना जबाबदार धरुन त्यांच्यावर जी कार्यवाही करण्याचे प्रस्तावित केले आहे, याबाबत प्रथम त्यांची बाजू त्यांना मांडण्यास संधी देण्यात यावी व त्यांचेकडून सादर झालेल्या माहितीच्या आधारे सर्वकष प्रस्ताव पुढील सभेत सादर करण्यात यावा.

**कार्यक्रम बाब क्र.१०:- तारापूर औष्णिक उर्जा प्रकल्प ३ व ४ ची पाणी पुरवठा योजना, रेल्वे क्रॉसिंगचे काम करणेबाबत.**

रेल्वे क्रॉसिंगच्या कामामध्ये स्पर्धात्मक देकार प्राप्त व्हावेत या उद्देशाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणासह रेल्वे व सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणीकृत ठेकेदारांना देखील देकार सादर करण्यास परवानगी देण्याचा जो प्रस्ताव सादर करण्यांत आला आहे त्यास मान्यता देण्यात आली. मात्र याबाबतचा कंत्राटदारांना असणारा पूर्व अनुभव पाहूनच त्यांना पूर्वअर्हता दयावी यासही मान्यता देण्यात आली. तसेच ही बाब फक्त तारापूर औष्णिक उर्जा प्रकल्प ३ व ४ च्या पाणी पुरवठा योजनेसाठी मर्यादित न ठेवता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून ज्या-ज्या ठिकाणी यापुढे रेल्वे क्रॉसिंगची कामे करण्यात येतील त्या-त्या ठिकाणी वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी यास मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.११:-कंत्राटदाराच्या नोंदणीचे नियम बेरोजगार अभियंत्यांना सवलती**

दि.२३/१/२००१ च्या शासन निर्णय क्र.सीएटी १०९७/प्र.क्र.४२/इमारती २ अन्वये सार्वजनिक बांधकाम विभागाने "जे स्थापत्य अभियंते बेरोजगार अभियंते या संवर्गात सन २००० अखेरपर्यंत वर्ग ६ मध्ये नोंदणीकृत आहेत त्यांच्या नोंदणीचे पहिले नूतनीकरण पाच वर्षासाठी विनाअट करयात यावे" या निर्गमित केलेल्या सूचनांनुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील बेरोजगार अभियंत्यांच्या नोंदणी नूतनीकरणाबाबत कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात आली. याबाबतच्या सूचना सदस्य सचिव(तांत्रिक) यांनी सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना निर्गमित कराव्यात असे निर्देश देण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.१२:- बदलापूर अंबरनाथ पाणी पुरवठा योजनेतंर्गत देखभाल दुरुस्ती निधीतून व अगमेंटेशन फंडातून जलशुध्दीकरण केंद्र बुस्टर पंपींग मशिनमधील पंप्स् बदलणे व तत्सम कामे करण्यासंबंधी मंजूर कार्यक्रम बाबीत किरकोळ तांत्रिक बदल करणेबाबत.**

या पूर्वी रु.२३६.२५ लक्ष किंमतीच्या कामांना प्राधिकरणाच्या ९१ व्या सभेमध्ये मंजूरी देण्यात आली होती. सदर प्रस्तावामध्ये अंतर्भूत असणाऱ्या कामांमध्ये काही वाढीव कामे मंजूर किंमतीच्या अधिन राहून करण्यात येत असल्याचे या कार्यक्रम बाबीव्दारे सादर करण्यांत आले होते. सदर सुधारित प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.१३:- महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम १९७६ अंतर्गत करण्यात आलेल्या दुरुस्तीनंतर (दि.१० मार्च,१९९७) सहाय्यक अभियंता,श्रेणी २ पदावर अवैधरित्या करण्यात आलेल्या नेमणूका नियमित करण्याबाबत.**

या कार्यक्रम बाबीव्दारे सादर करण्यात आलेल्या प्रस्तावाची सविस्तर माहिती घेण्यात येऊन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामध्ये दि.१०/३/१९९७ च्या अध्यादेशाव्दारे अधिनियमातील दुरुस्तीनंतर अधीक्षक अभियंता यांनी थेट सहाय्यक अभियंता (श्रेणी-२) च्या पदवीधारक म्हणून केलेल्या नेमणूका नियमित करण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे प्रस्ताव पाठवावा, या प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.१४:-महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी/ कर्मचारी यांना शिक्षा बजावणे व त्या शिक्षेविरुध्द अपील करणारे प्राधिकारी निश्चित करणे, अधिकार प्रदान करणेबाबत.**

या कार्यक्रम बाबीव्दारे सादर करण्यात आलेला प्रस्ताव पुढील बैठकीत पुन्हाः सादर करावा असे निर्देश देण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.१५:-महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचाऱ्यांचे गोपनीय अहवालाचे संस्करण करणारे प्राधिकारी आणि संस्करणाअंती प्राप्त झालेल्या अभिवेदनावर अपीलीय प्राधिकारी घोषित करण्याबाबत.**

या कार्यक्रम बाबीव्दारे सादर करण्यात आलेला प्रस्ताव पुढील बैठकीत पुन्हाः सादर करावा असे निर्देश देण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.१६:-अक्कलकोट शहरासाठी तातडीची पाणी पुरवठा योजना,जि.सोलापूर कार्योत्तर मान्यतेबाबत.**

तात्कालीन अधीक्षक अभियंता,सोलापूर यांच्या १९८७-८८ मध्ये या योजनेचे काम निविदेशिवाय मे.स्वस्तिक इंडस्ट्रीज,पुणे यांना देण्याच्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता देऊन त्यावेळची अनियमितता क्षमापित करण्यांस मान्यता देण्यात आली व याबाबतची पुढील कार्यवाही सत्वर करण्याचे निर्देश देण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.१७:-महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २०००-२००१ वर्षाचे वार्षिक लेखे**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा २०००-२००१ चा लेखा स्वीकृत स्वरुपात महालेखापालांना सादर करण्याच्या अनुषंगाने जी कार्यवाही करण्यात आली त्यास रितसर मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.१८:- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या लेखा परिक्षणाचे काम भारताचे नियंत्रण व महालेखापाल यांचेकडे सोपविण्याबाबत कालावधी दि.१/४/२००२ ते दि.३१/३/२००७**

प्राधिकरणाच्या लेखा परिक्षणाचे दि.१/४/२००२ ते दि.३१/३/२००७ पर्यंतचे काम भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांचेकडे Comptroller and Aduditer general (Duties powers and conditions of services) Act १९७१ मधील कलम १४ नुसार सोपविण्याबाबत शासनास प्रस्ताव सादर करण्यासाठी मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.१९:-औरंगाबाद येथील सर्व्हे नं.१८३११ उस्मानपुरा येथील प्राधिकरणाच्या जागेभोवती कुंपण भिंत बांधण्याच्या खर्चास प्राधिकरणाची मंजुरी मिळणेबाबत,जि.औरंगाबाद**

या कार्यक्रम बाबीव्दारे सादर करण्यात आलेला प्रस्ताव पुढील बैठकीत पुन्हाः सादर करावा असे निर्देश देण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.२०:-महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समितीचे घेतलेल्या निविदा स्वीकृतीच्या व अस्वीकृतीच्या निर्णयावर शिक्कामोर्तब**

या कार्यक्रम बाबीव्दारे सादर करण्यात आलेला प्रस्ताव पुढील बैठकीत पुन्हाः सादर करावा असे निर्देश देण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.२१:- कर्जरोख्यासंबंधी करण्यांत आलेले विविध करार व त्या अनुषंगाने शासन व प्राधिकरणावर येणा-या जबाबदाऱ्या व बंधने**

या कार्यक्रम बाबीव्दारे सादर करण्यात आलेला प्रस्ताव पुढील बैठकीत पुन्हाः सादर करावा असे निर्देश देण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.२२:-महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सिडकोभवन (दक्षिण कक्ष) येथील दोन मजल्यावरील २४००० चौ.फूट जागा भाडे तत्वावर देणेबाबत.**

या कार्यक्रम बाबीव्दारे सादर करण्यात आलेला प्रस्ताव पुढील बैठकीत पुन्हाः सादर करावा असे निर्देश देण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.२३:-महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या पॅनेलवरील वकीलांच्या नेमणूकीचे विनियम २००१**

या कार्यक्रम बाबीव्दारे सादर करण्यात आलेला प्रस्ताव पुढील बैठकीत पुन्हाः सादर करावा असे निर्देश देण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.२४:-महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांना स्वेच्छा सेवानिवृत्ती योजना लागू करण्याबाबत.**

या कार्यक्रम बाबीव्दारे सादर करण्यात आलेला प्रस्ताव पुढील बैठकीत पुन्हाः सादर करावा असे निर्देश देण्यात आले.

**आयत्या वेळची कार्यक्रम बाब क्र.१:-न्हावाशेवा पाणी पुरवठा योजना,टप्पा-१ येथील पंपाचे आयुष्यमान संपत आल्याने विद्युत देयकावर होणा-या खर्चात व दुरुस्तीपोटी होणा-या खर्चात बचत करण्यासाठी पंपींग मशिनरीमध्ये घसारा निधीतून सुधार करणेबाबत.**

न्हावाशेवा पाणी पुरवठा योजना,टप्पा-१ अतंर्गत वायल हेडवर्क्स व भोकरपाडा उदंचन केंद्रावरील पंपींग मशिनरी व संबंधीत उपकरणामध्ये सुधारणा करण्याच्या रु.१०४.३७ लक्ष किंमतीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. ही कामे घसारा निधीतून करण्याचे प्रस्तावित असून या संबंधिची पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव,म.जी.प्रा. यांना प्राधिकृत करण्यात आले.

**आयत्या वेळची कार्यक्रम बाब क्र.२:- बीड वाढीव पाणी पुरवठा योजना(माजलगाव उद्भव),गट क्र.१ ची निविदा शीर्ष कामे व प्रक्रियापूर्व पाण्याच्या उर्ध्ववाहिनीची निविदा.**

१. **कार्यादेश देण्यापूर्वीची सुरक्षा अनामत रक्कम ही बँक गॅरेटीच्या स्वरुपात स्विकारणे**

या प्रस्तावाच्या अनुषंगाने सर्वकष चर्चा करण्यात येवून निविदा स्वीकृतीनंतर कार्यादेश देण्यापूर्वी घ्यावयाची २% सुरक्षा अनामत रक्कम बँक गॅरेटीच्या स्वरुपात घेण्यास मान्यता देण्यात आली. तसेच या कामाचे कार्यादेश त्वरित देण्यात येऊन प्राधान्याने कामे हाती घेण्याचे सूचित करण्यात आले.

२. **या निविदेसाठी जमवाजमव उचल देणेबाबत.**

जमवाजमव उचल देणे ही बाब निविदापूर्व बैठकीमध्ये अमान्य करण्यात आलेली असल्यामुळे व सध्या प्राधिकरणाकडून जी कार्यप्रणाली अवलंबण्यात आलेली आहे त्यानुसार नवीन निविदांसाठी जमवाजमव उचल दिली जात नाही ही बाब विचारात घेता, या निविदेसाठी सुध्दा जमवाजमव उचल देण्यात येऊ नये असा निर्णय घेण्यात आला.

उपरोक्त चर्चेअंती सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपविण्यात आली. M.J.P.sabha-९३-२५ July,२००२/krc